RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६४ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२३ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सुप्रीम कोर्टाने क्युरेटिव्ह पिटिशन स्वीकारली मराठा समाजाला मोठा दिलासा

### २४ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात होणार सुनावणी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकार व इतरांनी सादर केलेल्या क्युरेटिव्ह याचिका सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारली आहे. मराठा आरक्षणाच्या बाबतीत हा मोठा दिलासा समाजाला जात आहे. याबाबत बाबत माहिती देतांना मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी म्हटले आहे की, क्युरेटिव्ह पिटिशन बाबत सर्वोच्च न्यायालयाने आज भाष्य केले आहे. येत्या २४ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा क्युरेटिव्ह पिटिशन सुनावणीसाठी ठेवली आहे. याच अर्थ असा होतो की, क्युरेटिव्ह पिटिशन सर्वोच्च न्यायालयाने नाकारले नसून, ते स्वीकारले आहे. त्यामुळे आम्हाला विश्वास आहे की, लवकरात लवकर यात सुनावणी होईल आणि मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मिळेल, असे



विनोद पाटील म्हणाले आहेत.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्य सरकारने दाखल केलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर काही दिवसांपूर्वी सुप्रीम कोर्टात सुनावणी पूर्ण झाली होती. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर इन-चेंबर ही सुनावणी पार पडली होती. दरम्यान, यावेळी राज्य सरकारने सुनावणीत आपली भूमिका मांडली होती. त्यामुळे, या प्रकरणावर सुप्रीम कोर्ट लवकरच आपला निकाल देण्याची शक्यता वर्तवली जात होती. ज्यात क्युरेटिव्ह पिटिशन स्वीकारले जाणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, आता न्यायालयाने अखेर आज क्युरेटिव्ह पिटिशन स्वीकारली असल्याचं विनोद पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे सरकारसाठी आणि मराठा समाजासाठी हा मोठा दिलासा असल्याचे बोलले जात आहे.

## प्रमुख विरोधी चेहऱ्यांना सोबत घेत काँग्रेसची 'भारत जोडो' यात्रा दोन ची तयारी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

आगामी २०२४ लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनं विरोधी पक्षांनी भाजपाला मात देण्याची रणनीती आखली आहे. विरोधकांनी इंडिया आघाडी बनवत सर्व राज्यात मजबूतीने निवडणूक लढण्याची तयारी केलीय. आता काँग्रेस जानेवारी २०२४ च्या पहिल्या आठवड्यानंतर भारत जोडो यात्रेचा दुसरा टप्पा सुरू करू शकते. राहुल गांधींच्या नेतृत्वात निघालेल्या या यात्रेमुळे काँग्रेसला प्रचंड यश मिळाले. त्याचा लोकसभा निवडणुकीतही फायदा उचलण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. त्यामुळे भारत जोडो यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचे नियोजन करण्यात काँग्रेस नेते व्यस्त आहेत.



सूत्रांनुसार, राहुल गांधींच्या नेतृत्वात भारत जोडो यात्रा २.० हायब्रिड मोडवर असेल. ज्यात पदयात्रेसोबतच वाहनांचा उपयोग केला जाईल. यात्रेसाठी २ मार्ग शोधले जात आहेत. जर ते अंतिम झाले तर त्याची सुरुवात पूर्वोत्तर राज्यातून केली जाईल. यंदा रॅलीचे फोकस उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रावर असल्याचे काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले. निवडणुकीपूर्वीची ही यात्रा असल्याने त्यात विरोधी पक्षातील प्रमुख चेहरेही सहभागी होतील. २१ डिसेंबरपासून होणाऱ्या काँग्रेस कार्यकारणीच्या बैठकीत या यात्रेच्या नियोजनावर चर्चा होणार आहे.

भारत जोडो यात्रेचा पहिला टप्पा ७ सप्टेंबर २०२२ रोजी तामिळनाडूच्या कन्याकुमारी इथून झाला होता. जानेवारी २०२३ मध्ये जम्मू काश्मीरच्या श्रीनगर येथे ही यात्रा संपली होती. यावेळी राहुल गांधींनी जवळपास ४८०० किमी अंतर कापले होते. या १२६ दिवसांत १२ राज्यातील ७५ जिल्ह्यातून ही यात्रा मार्गस्थ झाली होती. भारत जोडो यात्रा ही भारतातील सर्वात मोठी पदयात्रा ठरली होती.

भारत जोडो यात्रेच्या पहिल्या टप्प्यात राहुल गांधींसोबत अनेक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. त्यात कमल हसन, पूजा भट्ट, रिया सेन, स्वरा भास्कर, रश्मी देसाई, आकांक्षा पुरी आणि अमोल पालेकरसारख्या टीव्ही आणि फिल्म जगतातील लोक होते. त्याचसोबत माजी लष्कर प्रमुख दीपक कपूर, निवृत्त नौदल प्रमुख एल रामदास, माजी आरबीआय गव्हर्नर रघुराम राजनसारखे विचारवंत आणि निवृत्त अधिकारीही सहभागी झाले होते.राजकीय नेत्यांमध्ये फारूख अब्दुला, मेहबुबा मुफ्ती, आदित्य ठाकरे, प्रियंका चतुर्वेदी, संजय राऊत, सुप्रिया सुळे हेदेखील यात्रेत चालले होते.

## खासदार सुप्रिया सुळेंच्या निलंबनावर अजित पवारांचं भाष्य

### संसदेत नियमाचा भंग झाल्याने कारवाई

**दि. २३विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विरोधीपक्षाच्या जवळपास दीडशे खासदारांचं लोकसभा आणि राज्यसभेतून निलंबन करण्यात आलं आहे. एवढ्या मोठ्या संख्येनं खासदारांचं निलंबन झाल्यामुळे देशभरातून यावर टीका केली जात आहे. निलंबन केलेल्या खासदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांचाही समावेश आहे. सुप्रिया सुळेंच्या निलंबनावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिल्यांच प्रतिक्रिया दिली.



केवळ सुप्रिया सुळे यांचं एकट्याचंच निलंबन झालं नाही, अनेक खासदारांचं निलंबन झालं आहे. संसदेत नियमाचा भंग झाल्याने कारवाई केली आहे, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली. ते पुण्यात पत्रकारांशी संवाद साधत होते.

सुप्रिया सुळेंच्या निलंबनाबाबत विचारलं असता अजित पवार म्हणाले, फक्त सुप्रिया सुळेंचं निलंबन झालं नाही. अनेक खासदारांचं निलंबन झालं आहे. जेव्हा खासदार किंवा आमदार विधिमंडळांत, लोकसभेत आणि राज्यसभेत काम करत असतात. त्यावेळी कुठल्या तरी नियमाचा भंग झाल्यास त्याप्रमाणे कारवाई केली जाते. त्यानुसारच निलंबनाची कारवाई झालेली आपण पाहिली आहे.

जवळपास दीडशे खासदारांचं निलंबन झाल्याबद्दल विचारलं असता अजित पवार पुढे म्हणाले, तिथे काय घडलं? हे मला माहीत नाही. विधानसभेत काय घडलं? हे विचारलं असतं तर मी सांगितलं असतं. माझ्या माहितीप्रमाणे संसदेत उपराष्ट्रपतींचा अपमान करण्यात आला. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान किंवा कुठल्याही राज्याचे मुख्यमंत्री असतील, ही महत्त्वाची पदं आहेत. एवढ्या मोठ्या भारतात लोकशाही पद्धतीने निवडून गेलेले ते लोक असतात. ते आपापलं काम योग्य पद्धतीने करत असतात. कारण ज्यावेळी एवढा मोठा समाज त्यांच्या पाठिशी उभा राहतो आणि त्यांच्या विचारांच्या लोकांना निवडून देतो. याचा अर्थ त्यांनी कुठेतरी जनाधार मिळवलेला असतो. उपराष्ट्रपतीही अतिशय व्यवस्थितपणे आपलं स्वतःचं काम पार पाडत असतात. असं असताना तिथे जी काही घटना घडली, त्यामुळे त्यांच्यावर ती कारवाई झाली आहे.

## माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण भाजपात येण्यास इच्छुक

### राजकीय वातावरण ढवळून निघण्याची शक्यता

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नांदेड**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे भाजपात जाण्यास इच्छुक असल्याची पुन्हा चर्चा सुरु झाली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नांदेड येथे खूद्द याबाबत म्हटल्याने आगामी काळात नांदेड शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा नुकताच नांदेड दौरा झाला. या दौऱ्यात त्यांनी मुखेड आणि नांदेड शहरातील सुपर वॉरियर्सची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे भाजपात येण्यास इच्छुक असल्याचे कार्यकर्त्यांना सांगितले. त्याबाबत खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिला.



खासदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले अशोक चव्हाण यांच्या साखर कारखान्याची दीडशे कोटी रुपयांचे थकहमी मागच्या सरकारने माफ केली नाही पण भाजपाच्या नेत्यांकडे जेव्हा चव्हाण गेले तेव्हा महायुती सरकारने थकहमी दिली. यावरून लक्षात घेतले पाहिजे असेही चिखलीकर यांनी नमूद केले. दरम्यान काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण सत्तेसाठी येऊ शकतात त्यांचे भाजपात स्वागत आहे असेही चिखलीकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान भाजपा तिसरा पक्ष फोडणार आहे असे जयंत पाटील म्हणाले होते. यावर बावनकुळे यांनी आम्ही कोणता पक्ष फोडायला जाता नाही, पण भाजपचा दुपट्टा घालण्यास कोणी तयार असेल तर आम्ही त्यांचे स्वागत करतो.

केंद्रातील मोदी सरकारच्या राज्यातील माहिती सरकारच्या विविध योजना व विकास कामे थेट जनतेपर्यंत पोहोचवत आगामी निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला व मोदींना समर्थन मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केल्याचे बावनकुळेंनी सांगितले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अजित गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष गजानन घुगे, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, विभागीय संघटनमंत्री संजय कौडगे , नांदेडचे शहराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, दक्षिण नांदेडचे जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे,उतर नांदेडचे जिल्हाध्यक्ष सुधाकर भोयर, आमदार राम पाटील रातोळीकर, प्रदेश सचिव किरण पाटील, नांदेड लोकसभा प्रमुख देविदास राठोड, माजी खासदार सूर्यकांता पाटील, प्रवीण साले, मिलिंद देशमुख, डॉ. मोहन चव्हाण, नवनाथ बन आदी उपस्थित होते.

## मीसुद्धा पद्मश्री परत करेन, बृजभूषण सिंहांविरोधात आणखी एका कुस्तीपटूची मोठी घोषणा

**दि. २३ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

संजय सिंह यांची रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या (भारतीय कुस्ती महासंघ) अध्यक्षपदी निवड झाली आहे. संजय सिंह हे कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांचे जवळचे सहकारी आहेत. बृजभूषण सिंह यांनी अनेक महिला कुस्तीपटूंचं लैंगिक शोषण केल्याचे त्यांच्यावर आरोप आहेत. या आरोपांनंतर बृजभूषण यांच्यावर कारवाईची मागणी करत अनेक कुस्तीपटूंनी दिल्लीत ४० दिवसांहून अधिक काळ आंदोलन केलं होतं. या आंदोलनानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याव्यतिरिक्त दुसरी कुठलीही मोठी कारवाई झाली नाही. परंतु, कुस्तीपटूंच्या मागणीनंतर बृजभूषण यांना कुस्ती महासंघांची निवडणूक लढवता आली नाही. दरम्यान, त्यांचेच सहकारी कुस्ती महासंघाचे अध्यक्ष झाल्याने कुस्तीपटू निराश झाले आहेत.

## भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा! मलेरियावरील भारतीय लसीचा आरोग्य संघटनेच्या यादीत समावेश

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मलेरिया रोगावरील भारतीय लसीला जागतिक आरोग्य संघटनेच्या यादीत सामील करण्यात आलं आहे. मलेरिया आजाराने भारताप्रमाणे अनेक देशांमध्ये कहर माजवला आहे. आता मलेरिया आजारावरील एका भारतील लसीला जागतिक आरोग्य संघटनेने लसीकरणाच्या यादीत सामील केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे सीरम



इन्स्टिट्युटने ही लस तयार केली आहे. सीरम इन्स्टिट्युटच्या R21/Matrix-M या मलेरिया वॅक्सिनने जागतिक आरोग्य संघटनेच्या विविध ७५ चाचण्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. यानंतर डब्ल्यूएचओने या लसीचा यादीत समावेश केला आहे.

मलेरियावरील या भारतीय लसीचं नाव R21/Matrix-M असं आहे. ही लस पुण्यातील सीरम इन्स्टिटयूट आणि ऑक्सफर्ड विद्यापिठातील शास्त्रज्ञांनी मिळून तयार केली आहे. याआधीच जागतिक आरोग्य संघटनेने या लसीला मंजुरी दिली होती. आता जागतिक आरोग्य संघटनेने या लसीला लसीकरण यादीत सामील केलं आहे. भारताने ३० वर्षांच्या अथक परिश्रम आणि संशोधनानंतर मलेरियावरील ही लस विकसित केली आहे.

**मलेरियावर स्वस्त आणि प्रभावी उपाय**

WHO च्या मलेरिया प्रीक्कालिफाइड यादीत सामील होणारी दुसरी आणि पहिली भारतीय लस आहे. याआधी गेल्या वर्षी एका लसीचा या यादीत समावेश करण्यात आला होता. पण, त्यानंतर भारताने R21/Matrix-M निर्मिती करत जगाला मलेरियावरील स्वस्त आणि प्रभावी उपाय उपलब्ध करुन दिला आहे.

## राज्यभरात दुमदुमणार रामलल्लाचा जयघोष; अयोध्येतील भव्य दिव्य सोहळ्यासाठी भाजपची विशेष तयारी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याची प्रतीक्षा सध्या संपूर्ण भारतीयांना लागली आहे. त्यातच हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी अनेकांचे प्रयत्न सुरू आहे. अशातच महाराष्ट्रातील श्रीरामभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे.अयोध्येतील राम मंदिरातीय जयघोष राज्यभरात दुमदुमणार आहे. भाजपने या सोहळ्यासाठी विशेष तयारी केली आहे. मुंबईतील भाजप कार्यालयात ७ दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

१५ जानेवारी ते २२ जानेवारीला हे आयोजन करण्यात येणार असन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कार्यक्रमांच उद्घाटन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांच्यासह राज्यातील



भाजप आमदार तसेच पदाधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार आहे. राम मंदिर सोहळ्यासाठी भाजपच्या प्रदेश कार्यालयाबाहेर रामाची मोठी फ्रेम, राम मंदिराची प्रतिकृती आणि रोषणाई करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला अनुप जलोटा, अभिनेत्री दीपिका चिखलिया, अरुण गोविल यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे.

### असा असणार ७ दिवसीय सोहळा?

१७ जानेवारीला या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार आहे.

१७जानेवारीला सोमा घोष यांचा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम ठेवण्यात येणार आहे.

१७ जानेवारीला संध्याकाळीअलका झा, सुरेश आनंद आणि घनश्याम जी यांचा भजनाचा कार्यक्रम असेल.

१८ जानेवारीला अनुप जलोटा यांचे भजन आणि संगीताचा कार्यक्रम ठेवण्यात येणार आहे.

२० जानेवारीला कार्यक्रमात रामायण मालिकेतील अभिनेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

२१ जानेवारीला कवी मनोज शुक्ला यांचा कार्यक्रम ठेवण्यात येणार आहे.

२२ जानेवारीला पद्मश्री सुरेश वाडकर यांचे देखील कार्यक्रम ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण भाजपच्या सोशल मीडियावरून केले जाणार आहे.

## 'यालाच सगळं कळतंय का? एकाकी पडल्यामुळे भ्रमिष्ट झालाय', मुश्रीफांची आव्हाडांवर टीका

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक कोल्हापूर**

भाजप आणि शिंदेंसोबत जाण्यासाठी जितेंद्र आव्हाडांचा पुढाकार होता, असा गौप्यस्फोट वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफांनी केला आहे. तर आव्हाडांना पक्षात कोणीही विचारत नाही, अशी टीका देखील मुश्रीफांनी यावेळी केली आहे. ते कोल्हापुरात माध्यमांशी होते. एकाकी पडल्यामुळे आव्हाड भ्रमिष्ट झाल्याचे देखील वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले. मंत्री हसन मुश्रीफांनी जितेंद्र आव्हाडांवर गंभीर आरोप केले आहेत. आरोप करताना मुश्रीफांनी जितेंद्र आव्हाडांवर एकेरी शब्दात हल्लाबोल केला आहे. यालाच सगळं कळतय का? असे म्हणत एकेरी शब्दात टीका केली आहे. मुश्रीफ आव्हाड म्हणाले, जितेंद्र आव्हाडांना पक्षात कोणी विचारत नाहीत. एकाकी पडल्यामुळे ते भ्रमिष्ट अवस्थेत आहेत. आमची सत्ता पहिल्यांदा गेली तेव्हा भारतीय जनता पार्टी आणि शिंदे यांच्या सोबत जावे यासाठी जितेंद्र आव्हाड यांनी पुढाकार घेतला होता. यावेळी आमदारांनी सह्या केल्या त्या पेपरवर जितेंद्र आव्हाडांची सही एक नंबरला होती.

## संपादकीय ......

# पाकिस्तान ची बदमाशी

*पाकिस्तान इज अ फेल्ड स्टेट म्हणजेच पाकिस्तान हे पूर्णतः अपयशी ठरलेले राष्ट्र आहे, असे जगातील अनेक नामवंत राजकीय इतिहासकारांनी नमूद करून ठेवले आहे. आज पाकिस्तानातील अर्थव्यवस्था कमालीच्या संकटात आहे. महागाईमुळे सामान्य माणसाचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. प्रसिद्ध पाकिस्तानी अभिनेत्री आयेशा उमरने केवळ आपल्यालाच नव्हे, तर सर्वच महिलांना पाकिस्तानात सुरक्षित वाटत नसल्याचे जाहीर वक्तव्य केले. या देशाची खस्ता हालत स्पष्ट व्हायला ते पुरेसे आहे. महिला सार्वजनिक ठिकाणी मोकळेपणाने वावरू शकत नसल्याची वेदना मांडताना 'मला कराचीत दोनदा लुटले गेले. पाकिस्तानात मी अपहरण, बलात्कार आणि चोरांच्या भीतीशिवाय निवांत जीवन कधी जगू शकेन अशी भावनाही तिने व्यक्त केली आहे*

*खुद्द पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान हे भ्रष्टाचाराच्या आरोपावरून तुरुंगात आहेत. तुरुंगात नेतानाही त्यांना मारहाण व धक्काबुक्की झाली. पाकिस्तानात लवकरच सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत, तरीही देशातील अस्थिरता संपण्यांची चिन्हे नाहीत. आता पकिस्तानच्या आर्थिक संकटास भारत किंवा अमेरिका जबाबदार नाही, तर आम्हीच आमच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली देशातली लष्कराच्या वर्तनामुळेच देश आर्थिकदृष्ट्या कंगाल झाला आहे, अशी तोफ माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान मुस्लीम लीग-नवाझ (पीएमएल-एन) प्रमुख नवाज शरीफ यांनी डागल्याने तेथील राज्यकर्त्यांना घरचा आहेर मिळाला. पाक लष्कराने २०१८ च्या निवडणुकीत गैरप्रकार करून, पंतप्रधानपदी इम्रान यांना निवडून आणले: इम्रान यांच्या काळात देशाची आर्थिक धूळदाण उडाली, असा आरोप शरीफ यांनी केला. त्यात नक्कीच तथ्य आहे लोकशाहीचे नाटक वठवण्यासाठी इम्रान नावाचे प्यादे उभारले गेले आणि ते लष्करालाच आव्हान देऊ लागल्यावर त्यांना न्यायालयाच्या मदतीने थेट जेलमध्येच टाकण्यात आले. अमेरिकेने षड्यंत्र रचून आपल्याला पंतप्रधानपदावरून हाकलले, असा आरोप इम्रान पांनी केला होता, तरीही इम्रान यांच्याबद्दल पाकिस्तानात सहानुभूती असून अमेरिकाविरोधी धोरणामुळे त्यांची लोकप्रियता वाढूही शकते. तीन वर्षांपूर्वी नवाज शरीफ यांना लंडनमध्येच अटक करावी, असा फतवा पाक न्यायालयाने काढला होता. आता तेच शरीफ लष्कर तसेच न्यायालयाच्या आशीर्वादाने चार वर्षांनतर मायदेशी परतले पंतप्रधानपदी असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आणि उष्कराच्या मनातूनही ते उतरले. त्यांना सत्तेतून बाहेर जावे लागले सात वर्षांची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर वैद्यकीय उपचारासाठी ते ब्रिटनमध्ये गेले, पाकिस्तानातील न्यायव्यवस्थाही अजब! सजा ठोठावली गेल्यानंतरही अतिमहत्त्वाची व्यक्ती आरोपी असेल, तर ती विदेशात जाऊन मजेत राहूही शकते, शिवाय उष्कराची मर्जी कधी कोणावर बसेल आणि कधी उतरेठ, हेही सांगता येत नाही.*

*सौदी राजे फहाद यांच्या मदतीमुळे नवाज देशांतर करून जेद्दा येथे राहू शकते. पुढच्या टप्प्यात शरीफ पुन्हा एकदा पंतप्रधान झाले, तेव्हा पठाणकोट व उरी येथे पाक लष्कराने अतिरेकी हल्ले केले. त्यावरून शरीफ आणि पाकिस्तानी लष्कर यांचे मतभेद झाले होते. शरीफ यांना इस्लामाबाद उच्च न्यायालयाने आता अटकेपासून संरक्षण देणारा जामीन मंजूर केला आहे. त्यांच्या पीएमएल-एन पक्षाचे नेतृत्व सध्या त्यांचे बंधू व माजी पंतप्रधान शाहबाझ शरीफ करत आहेत. एप्रिल २०२२ ते ऑगस्ट २०२३ या काळात शाहबाझ पाकिस्तानचे पंतप्रधान होते; परंतु शाहबाझ यांना करिश्मा नाही, मात्र ते लष्कराचे लाडके आहेत. उलट नवाज यांच्या नावाचा देशभर दबदबा आहे. आज भारताच्या तुलनेत पकिस्तान अक्षरशः कःपदार्थ आहे. देशाचे सत्ताधारी जगभरात कटोरा घेऊन फिरत आहेत. वाजपेयी पंतप्रधान झाले, तेव्हा भारताकडे फक्त एक अब्ज डॉलरची गंगाजळी होती. आता ती ६०० अब्ज डॉलर झाली, याकडे नवाज यांनी रास्तपणे लक्ष वेधले आहे.*

# विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांच्याकडून यवतमाळ जिल्ह्यातील निवडणूक कामकाजाचा आढावा

## मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम ; दिग्रस मतदारसंघाला भेट



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. निधी पाण्डेय यांनी गुरुवारी (२१ डिसेंबर) यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयाला भेट देऊन मतदार नोंदणी व निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेतला.



यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार विठ्ठल कुमरे, शिवाजी मगर, स्नेहल देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम-२०२४ जाहीर केला आहे. मतदार यादीच्या कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाने विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांची मतदार यादी निरीक्षक नेमणूक केली आहे. त्यानुसार डॉ. पाण्डेय यांनी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस मतदार संघांतर्गत येणाऱ्या दारव्हा उपविभागीय कार्यालयात सभा घेऊन मतदार यादी पुनरिक्षक कार्यक्रमाचा आढावा घेतला. याप्रसंगी विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांच्या हस्ते दारव्हा तहसील कार्यालयातील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट प्रात्यक्षिक व प्रसिध्दी केंद्राचे उदघाटनही करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्तांच्या उपस्थितीत महाविद्यालयीन विद्यार्थीनींना ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीनवर मतदानाच्या प्रात्यक्षिकाव्दारे मार्गदर्शनही करण्यात आले.

दिग्रस विधानसभा मतदारसंघात विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत एकूण ४,९०१ मतदारांची नोंदणी झाली असून त्यापैकी १,९४७ महिला मतदारांची नोंदणी झालेली आहे. तसेच अठरा ते एकोनाविस वर्षे वयोगटातील १,६१० पुरुष आणि १,००६ महिला असे एकूण २,६१६ नवमतदारांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती दारव्हाचे उपविभागीय अधिकारी श्री. खडसे यांनी बैठकीत दिली.

नवीन मतदार अर्ज स्वीकृती तसेच मतदार यादीतून अपात्र मतदार वगळणे, मतदार यादीमध्ये महिला व तरुण मतदारांची संख्या वाढविणे, दिव्यांग मतदारांच्या नावापुढे नोंदणी करणे, स्वीप व ईव्हीएम जनजागृती कार्यक्रम आदी उपक्रमांची विभागीय आयुक्तांनी माहिती घेतली. जिल्ह्यात मतदार यादी जनजागृती आणि ईव्हीएम जनजागृतीचे काम चांगले प्रयत्न सुरु असल्याबाबत डॉ. पाण्डेय यांनी समाधान व्यक्त केले.

# मेळघाटात 'पर्यटनातून परिवर्तनाकडे' उपक्रम

## सेमाडोह येथे पार पडला उद्घाटन सोहळा



### महिला शेतकऱ्यांचे नागरिकांना आवाहन

'चला मेळ्याटला वन शेती पर्यटनाला ' स्वच्छ सुंदर सिपणा नदीच्या किनारी होणारी शेती आणि आदिवासी शेती जीवन अनुभवायला. शेतांमध्ये फिरून सुंदर फोटो व्हिडीओ रिल्स काढायला. वन शेती भोजन तुमच्या मुलांना शेती संस्कृतीचे, पीक पाण्याचे अनुभव घडवायला, असेही आवाहन या सेमडोहच्या मेळ्याटातील महिला बचत गटाच्या महिला शेतकऱ्यांनी केले आहे.

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट–** युनायटेड नेशन्सच्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स 'लाइफ ऑन लॅंड'चे उद्दिष्टे परिपूर्ण करणारा, हवामान बदल पूरक, कमी पाण्यात येणारा 'लोकवन' या सुधारित वाणाच्या गव्हाचे उत्पादन सेमाडोहचे शेतकरी दरवर्षी सिपना नदीच्या उच्च प्रतीचे सेंद्रिय कर्ब असलेल्या गाळाच्या मातीत घेतात. हा उत्पादित गहू सेमाडोहचे शेतकरी अचलपूर, परतवाडा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्री करतात. परंतु, योग्य असा भाव मिळत नसल्याची खंत गावातील शेतकरी व्यक्त करत होते. हे लक्षात घेऊन निसर्ग फाऊंडेशनचे संचालक धनंजय सायरे, गिता बेलपत्रे यांनी महिला आर्थिक विकास मंडळाच्या माध्यमातून मेलघातील महिला बचत गट तयार करून 'शेतकरी ते ग्राहक' हा गहू विक्री करण्यासाठी 'पर्यटनातून परिवर्तनाकडे' असा उपक्रम हाती घेतला आहे. 'आम्ही तुमचे फॅमिली फार्मर' असे घोषवाक्य देऊन या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.या उद्घाटनाला तालुका मंडळ कृषी अधिकारी अजय कांबळे, आत्माचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक गजानन राठोड, कृषी पर्यवेक्षक किशोर चौधरी, शीतल भास्कर, मनीष जगताप उपस्थितहोते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने तालुका कृषी अधिकारी कार्यालयातर्फे नैसर्गिक शेती मिशन, पीएम किसान सन्मान योजना तसेच आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत न न्यूकिअस बजेट योजना याबाबत उपस्थितशेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. तसेच नैसर्गिक शेती मिशन योजनेत सहभागी होण्याचे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले. आम्ही तुमचे 'फॅमिली फार्मर' या उपक्रमात सेमाडोह येतील १० शेतकरी कुटुंब सहभागी झाले आहेत. एकूण ३२ एकरांत हे गव्हाचे क्षेत्र असून अंदाजित ४०० क्विंटल गहू येथे उत्पादन होऊ शकते, अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. लोकवन वाण आरोग्याचे फायदे देणारे आहे. लोअर क्रॉनिक इन्फ्लेमेशन, हृदयविकाराचा धोका कमी करते, आतड्याची योग्य हालचाल वाढवते. लोकवान गव्हाच्या दाण्यांमध्ये सेलेनियम, व्हिटॅमिन इ आणि झिंक असते जे मुरूम, टॅनिंग आणि त्वचेच्या कर्करोगासारख्या त्वचेच्या समस्यांशी लढा देतात.

# १.८६ लाख हेक्टरला फटका, २०६ कोटींच्या निधीची मागणी

## पंचनामे पूर्ण, शासनाला अहवाल सादर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** जिल्ह्यात २६ नोव्हेंबर ते ७ डिसेंबरदरम्यान झालेल्या अवकाळीने २,९७,९७२ शेतकऱ्यांच्या १,८५,६९६ हेक्टरमधील खरीप व रब्बी पिके, फळपिके व भाजीपाला पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झालेले आहे. यासाठी २०६ कोटी ३३ लाख ३२ हजार ८३० रुपयांच्या मदतनिधीची मागणी जिल्हाधिकाऱ्यांनी शुक्रवारी शासनाकडे केली.

अवकाळीने २,५१,०४९ शेतकऱ्यांच्या १,४८,०४३ हेक्टरमधील जिरायती पिकांचे नुकसान झालेले आहे. यासाठी १२५.८३ कोटींच्या अनुदानाची मागणी शासनाकडे करण्यात आली. यामध्ये नांदगाव व तिवसा तालुक्यांत नुकसान निरंक आहे. प्रत्यक्षात तिवसा तालुक्यात ११,५०९ हेक्टर व नांदगाव तालुक्यात ४,२२८७ हेक्टर बाधित झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे.

कापूस फुटायला सुरुवात झालेली असताना मजुरांअभावी वेचणी रखडली होती. दरम्यान अवकाळीने दणका दिल्याने कापूस बोंडातच भिजला व प्रतवारी घटली. याशिवाय तुरीचा बहर गळल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. जिल्हा प्रशासनाद्वारा १.६५ लाख हेक्टरमधील पिके बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज जिल्हा प्रशासनाने शासनाला पाठविला होता.




## महिनाभर सतत अंजीर खाल्ल्यास काय होईल? आरोग्य तज्ञांकडूनच जाणून घ्या

दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक

अंजीर कोरड्या फळांमध्ये गणले जाते. हे एक फळ आहे जे ताजे आणि कोरडे दोन्ही खाऊ शकते. अंजीरचा तापमानवाढीचा प्रभाव असतो आणि हिवाळ्यात अंजीर खाल्ल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. यामध्ये अँटीऑक्सिडंट्स, पॉलिफेनॉल आणि फायबर मुबलक प्रमाणात आढळतात. आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, सकाळी रिकाम्या पोटी अंजीर खाल्ल्याने अनेक आरोग्यास फायदे मिळतात.

काही लोक सकाळ आणि संध्याकाळचा नाश्ता म्हणून अंजीर खातात. पण जर तुम्ही रोज अंजीर खाण्यास सुरुवात केली तर काय होईल? यामुळे या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात.

हृदय आणि हाडे मजबूत करा

या संदर्भात डॉक्टर पंकज वर्मा सांगतात की, जर तुम्ही महिनाभर सतत अंजीर खात असाल तर ते तुमच्या शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. तसेच, ते नियमितपणे खाल्ले पाहिजे. यामध्ये अनेक प्रकारचे घटक आढळतात जे तुमच्यासाठी फायदेशीर असतात. जसे की, ओमेगा-३, ओमेगा-६ फॅटी ॲसिड जे तुमचे हृदय निरोगी ठेवतात, हाडे मजबूत करण्यासाठी कॅल्शियम, रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी पोटॅशियम फायदेशीर आहे. याशिवाय व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-बी१, बी२, कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, मॅंगनीज, सोडियम आणि फायबरचे प्रमाण जास्त असते जे नैसर्गिक औषधाचे काम करते.

पण खाण्याची योग्य पद्धत कोणती?

जर तुम्ही अंजीर नियमितपणे



खात असाल तर रात्रभर ते पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी खाल्ल्यास ते तुमच्यासाठी खूप फायदेशीर आहे. जर तुम्ही महिनाभर हे सतत खाल्ले तर तुमच्या शरीरातील अनेक आजार बरे होऊ शकतात. त्यामुळे अंजीर नियमित खा आणि स्वतःला निरोगी ठेवा. त्यात फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्स देखील आढळतात, जे एक अँटी-ऑक्सिडेंट आहे, ते फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानीपासून तुमचे रक्षण करते.

त्यामुळे अंजीर नियमित खा आणि स्वतःला निरोगी ठेवा. त्यात फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉल्स देखील आढळतात, जे एक अँटी-ऑक्सिडेंट आहे, ते फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानीपासून तुमचे रक्षण करते. अंजीरचे अनेक गुणधर्म आहेत जे तुमच्या शरीरासाठी फार उपयुक्त आणि महत्त्वाचे आहेत.

# मुद्रांक शुल्क अभय योजनेच्या अंमलबजावणीची बैठक

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** मालमत्तेचे हस्तांतरण करताना कमी भरणा केलेल्या दस्तामध्ये महाराष्ट्र शासनाने ७ डिसेंबर २०२३ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेद्वारे मुद्रांक शुल्क व दंड माफी योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना दोन टप्यात राबविण्यात येणार आहे. योजनेचा पहिला टप्पा कालावधी १ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ व दुसरा टप्पा १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ या दोन टप्यात राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने २२ डिसेंबर रोजी उपायुक्त जुम्मा प्यारेवाले यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ च्या अंमलबजावणीबाबत बैठक घेण्यातआली. या बैठकीत अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर योजनेचे नियोजन करून रजिस्टर करण्याचे निर्देश उपायुक्तांनी दिल्या. तसेच नोंदणीकृत भाडे पट्ट्यावर देण्यात यावे. या योजनेचे पहिल्या टप्प्यात सन १९८० ते २००० या कालावधीत नोंदणीकरिता दाखल केलेले अथवा न केलेले दस्ताकरिता १ डिसेंबर ते ३१ जानेवारी, २०२४ या कालावधीत देव होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम रु. १ लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्क व दंडाची संपूर्ण रक्कम माफ केली आहे. देय होणारी रक्कम ही रु. १ लाखावरील असल्यास ५० टक्के व दंडाच्या रक्कमेत संपूर्णतः १०० सूट देण्यात आली आहे. या योजनेचे दुसऱ्या टप्याचा कालावधी मुद्रांक शुल्क व दंड भरणा केल्यास देय होणारी मुद्रांक शुल्कांची रक्कम रु.१ लाखापर्यंत असल्यास मुद्रांक शुल्कात व दंडात ८० टक्के सवलत दिलेली आहे. देय होणारी रक्कम ही रु.१ लाखावरील असल्यास मुद्रांक शुल्कात ४० टक्के व दंडात ७० टक्के सवलत दिलेली आहे.



# आझाद हिंद मंडळांची राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा

## अमरावती च्या आकाश राजपूत ने पटकाविला आझाद श्री चा बहुमान

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती च्या वतीने स्व हरीभाऊ कलोती यांचे स्मृती प्रितर्थ्य आयोजीत राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेत अमरावती च्या आकाश राजपूत ने आझाद श्री चा बहुमान पटकाविला . त्याला ३१,०००/ रूपये रोख पुरस्कार देण्यात आला . तर अकोला च्या सुरेश जडिये बेस्ट पोझर ठरला ,त्याला ११,०००/रू. रोख व आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तत्पूर्वी या स्पर्धे चे उदघाटन आमदार प्रविण पोटे यांचे उपस्थितीत करण्यात आले. व्यायमाला चालना देणाऱ्या व शरीर सुदृढ करणाऱ्या स्पर्धा चे आयोजन सतत ३२ वर्षा पासून मंडळ करत आहे या बद्दल आ.प्रवीण पोटे यांनी मंडळा चे कौतुक केले. ही स्पर्धा ऐकून ७ गटात खेलविल्या गेली. पहिला गट ६० ते ६५ त्यामध्ये शिवाजी वाकोडे जमाल अन्सारी, दत्ता सावरकर, सोहेल खान, सूरज तीवाडे यांनी अनुक्रमे प्रथम व्दितीय तृतीय चतुर्थ व पाचवा क्रमांक पटकाविला. दुसरा गट ६० ते ६५ किलो या मध्ये मोहंमद शहजाद, शेख सलीम, शिवकुमार चव्हाण, सौरभ गणवीर व दीपक धानोरकर यांनी अनुक्रमे १ ते ५




क्रमांक प्राप्त केले. तिसरा गट ६५ ते ७० किलो या मध्ये सय्यद मोईद्दिन, प्रीतम साहू, योगेश विश्वकर्मा, इरफान खान व राजा ईवनाते यांनी अनुक्रमे १ ते ५ क्रमांक पटकाविले. चौथा गट ७० ते ७५ किलो या गटामध्ये मोहम्मद आवेश, अब्दुल फारुख, साकिब खान , व ओम बडवाइक यांनी १ते ५ क्रमांक पटकाविलेपाचवा गट ७५ किलो ते ८० किलो या मध्ये योगेश शेंडे, राहुल सरोदे, सर्वेश जडीये, रविंद्र कुंभरे व बॉबी साहू यांनी १ते ५ क्रमांक पटकाविले.सहावा गट ८० किलो च्या वर या मध्ये आकाश राजपूत, मोहमद तनवीर, सर्वेश साहू, आशिष साहू व तोसिफ खान यांनी १ ते ५ क्रमांक पटकाविलेसातवा मास्टर्स गट या गटात नरेश पोकळे, श्रीकांत आडे, सय्यद मोह्मद, संतोष बंधाते व हरीश जडीये यांनी अनुक्रमे १ ते ५ क्रमांक पटकाविलेसर्व गटातील प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवे स्थान प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना अनुक्रमे १०,०००, ८००० ,६०००, ४०००व २००० रूपये रोख व आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन खेळाडूचा उत्साह वाढविला.या प्रसंगी मिस इंडिया प्रीती अरोरा नवी दिल्ली यांनी आपल्या शरीर सौष्टव या खेळाचे प्रात्याशिक सादर करून महिला सुद्धा या खेळात मागे नाही हे दाखवून दिले. बक्षीस वितरण सोहळा मंडळाचे उपाध्यक्ष तथा माजी खासदार अनंतराव गूढे, माजी महापौर विलास इंगोले ,नंदू गुंबळे, दिलीप दाभाडे, डॉ किशोर फुले ,दिलीप कलोती , ज्ञानेश्वर हीवसे, सहायक आयुक्त भुषण पुसतकर , सुरेश रतावा, गजू राजगुरे, तसेच विदर्भ बॉडी बिल्डर असो. चे सर्व पदाधिकारी मान्यवर आदी उपस्थित होते.

# डॉ. रवि व स्मिता कोल्हे यांना नागभूषण पुरस्कार

**रविवारी पुरस्कार प्रदान सोहळा**

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक मेळघाट** – मेळघाटात आदिवासी समाजात रममाण होऊन सेवा करणारे पद्मश्री डॉ. रवि तथा स्मिता कोल्हे यांना नाग फाऊंडेशनचा प्रतिष्ठित नागभूषण पुरस्कार घोषित झाल्याने राज्यात कोल्हे दाम्पत्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नागपूर येथे रविवारी पुरस्कार वितरणाचा सोहळा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आला आहे.



पद्मश्री डॉ. रवि कोल्हे यांना सपत्निक नाग फाऊंडेशनच्या नागभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. नागपूर महोत्सवानिमित्ताने मागील ३० वर्षांपासून विदर्भातील लौकिक कार्य करणार्या समाजसेवकांना हा नागभूषण पुरस्कार देण्यात येत आहे. रोख एक लाख रुपये तथा सन्मानचिन्ह पंजाबचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांच्या हस्ते भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत रविवार, २४ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी अध्यक्ष अजय संचेती, विलास काळे, सचिव ॲड. निशांत गांधी, सतीश गोयल, डॉ. गिरीश गांधी उपस्थित राहतील. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अनेक पुरस्कार प्राप्त करणार्या डॉ. रवि तथा डॉ. स्मिता कोल्हे यांना आता नवीन पुरस्कार मिळत असल्याने विदर्भात सर्वत्र कौतुक होत आहे.

# महिला पोलीस जमादारासह शिपायाला अटक

## वाळूच्या अवैध वाहतुकीसाठी मागितली २५ हजारांची लाच

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताकशेंदूरजना घाट** – वाळुची रॉयल्टी नसताना विना अडथळा वाहनाची वाहतूक करण्यासाठी २५ हजार रूपयांची लाच स्वीकारताना वरूड येथील महिला पोलीस जमादारासह शिपायाला लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने सापळा रचून अटक केली. जुना आमनेर बसथांब्याजवळ गुरूवारी (ता. २१) सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.वरुड ठाण्यात कार्यरत पोलीस जमादार जयश्री शरदपंत लांजेवार (वय ३८, रा. मोर्शी) आणि आशिष श्रीकृष्णराव भुते (वय ३३, रा. हिवरखेड) असे लाच घेतल्याप्रकरणी अटक पोलिसांची नावे आहेत. जयश्री लांजेवार व भुते हे दोघेही वरुड ठाण्यात असून आशिष भुते हे जयश्री लांजेवार यांचा लेखनिक आहे. तक्रारदार यांचा मुरुम आणि गिट्टीचा ट्रक आमनेर बिटमधून रॉयल्टी नसतानाही विना अडथळा जाऊ देण्यासाठी २५ हजार रुपयांची मागणी लांजेवार व भुते यांनी केल्याची तक्रार वाहतूकदाराने १२ डिसेंबरला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली होती. यातक्रारीची एसीबी पथकाने पडताळणी केली. पडताळणीदरम्यान एसीबीला तक्रारीत तथ्य आढळून आल्याने गुरुवारी सायंकाळी



जुना आमनेर बस थांबा येथे सापळा रचण्यात आला. त्यावेळी तक्रारदाराकडून लांजेवार व भुते यांनी २५ हजार रुपये लाच स्वीकारताच एसीबी पथकाने दोघांनाही रंगेहात पकडले. या कारवाईने ग्रामीण पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

एसीबीचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक शिल्पा भरडे, पोलीस निरीक्षक प्रवीण बोरकुटे यांच्यासह विनोद धुळे, शैलेश कडू, चित्रलेखा वानखडे, स्वप्निल क्षीरसागर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# अटल दौड हाप मॅरेथॉन राज्यस्तरीय स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात

## तुषार भारतीय मित्र मंडळ व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटनेचे आयोजन३५८७ स्पर्धकांची नोंदणी

**द.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणारी राज्यस्तरीय हा मॅरेथॉन स्पर्धा २५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ५:४५ वा होणार असून या स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या या स्पर्धेची उत्कंठा आता शिगेला पोचली आहे.




अटलजींनी भारतावर आज जन्म प्रेम केले . भारताला यशाच्या उत्तुंग शिखरावर अरुण करण्यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षण वाचला प्रतिकूल परिस्थितीतही सतत झुंज देत भाजपाची विचारधारा समाजात रुजवली . आयुष्यात आलेल्या प्रत्येक जबाबदारीवर योग्य न्याय देत त्यांनी समाजाची सेवा केली . याच विशाल वटवृक्षाच्या समर्थ खांद्यावर भाजपाची वेल वाढली आज तोच वेलू गगनावर गेल्याच प्रत्यय आपण घेत आहोत , अशा या महान विभूतीची स्मरण चिरकाल टिकावी, या उद्देशाने तुषार भारतीय मित्र परिवाराच्या वतीने स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा आयोजित केली आहे. राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धेचे उद्घाटन भाजप प्रदेश अध्यक्ष आ चंद्रशेखर बावनकुळे , आ प्रवीण पोटे , खा डॉ अनिल बोंडे , आ प्रताप अडसड , किरण पातूरकर , रवी खांडेकर , सौ निवेदिता चौधरी , सौ किरण महल्ले , जयंत डेहनकर , शिवराय कुलकर्णी , डॉ नितीन धांडे , रवी कोल्हे सह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते होणार असून स्पर्धेत धावण्यासाठी नोंदणी केलेल्या सर्व स्पर्धकांनी सकाळी ५:३० वा नेहरू मैदान राजकमल चौक येथे उपस्थित रहावे .

### स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विविध समित्यांचे गठन

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विविध समितीचे गठन करण्यात आले आहे .संयोजक, समन्वयक , तांत्रिक सहाय्यक , वेब पोर्टल , शासकीय यंत्रणा समन्वय , शहर सौंदर्यकरण, निवास व भोजन व्यवस्था, प्रचार व प्रसार करिता कार्यालय , सोशल मीडिया , मैदान व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था , मॅरेथॉन स्पर्धा दरम्यान प्रमुख चौकामध्ये स्वागत प्रमुख , नोंदणी प्रमुख , सामाजिक संस्थेसोबत समन्वयक, कायदेविषयक टीम इत्यादी अनेक प्रकारच्या समितीचे गठन करण्यात आले आहे. अटल दौड स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शेकडी कार्यकर्ते काम करीत आहे

### वयोगट

**(१) १४ वर्षाआतील**
मुले ३ घच मुली ३ KM
(२) १६ वर्षाआतील – मुले ५ घच मुली ३ KM
(३) २० वर्षाआतील – मुले ८ घच मुली ५ KM
(४) ४० वर्षावरील – पुरुष ५ घच् महिला ५ KM(
५) खुला वर्ग महिला/पुरुष (Run For Fun) ३-घच.
खुला वयोगट(१) पुरुष व महिला – १० KM(२) पुरुष व महिला -- २१ KM

### असा राहणार हाफ मॅरेथॉन स्पर्धाचा मार्ग

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा नेहरू मैदान येथून प्रारंभ होऊन राजकमल चौक , राजापेठ , कल्याण नगर , मोती नगर , राजेंद्र कॉलनी , कॉंग्रेस नगर , हॅलो कॉर्नर जिल्हाधिकारी कार्यालय , पंचवटी चौक , शेगाव नाका , विलास नगर , जुना कॉटन मार्केट , जयस्तंभ , जवाहर गेट , गांधी चौक , गौरक्षण चौक , भूतेश्वर चौक , रवीनगर , नवाथे चौक , राजापेठ , राजकमल आणि समारोप नेहरू मैदान होणार आहे .

# दिव्यांग व्यक्तींना मिळणार फिरते वाहन

## योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित व विकास महामंडळमार्फत दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्यासाठी हरीत उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावर दुकान योजनेंतर्गत मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या योजनेचा गरजू दिव्यांग व्यक्तींनी लाभ घेण्यासाठी दि. ४ जानेवारी २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.



शासन निर्णय दि.१० जून २०१९ नुसार गरजू दिव्यांग व्यक्तींना योजनेंतर्गत फिरते वाहनावर दुकान मोफत दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन http://evehiclefrom.mshfdc.co.in लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाईन अर्ज दि. ४ जानेवारी २०२४ सकाळी १० वाजेपर्यंत सादर करावा. योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित व विकास महामंडळ मर्यादित यांचे स्तरावरून सुरू आहे.

योजनेचा उद्देश : दिव्यांग व्यक्तींनी पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे. दिव्यांग व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे दिव्यांग व्यक्तींनी त्यांच्या परीवार, कुटुंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे होय.

# जाधव जिनिंग आणि प्रेसिंग ऑटोमायजेशन कंपनी अचानक बंद

## शेकडो कामगार झाले बेरोजगार, उपोषणाचा दिला इशारा

*दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–* *एमआयडीसी परिसरातील जाधव जिनिंग आणि प्रेसिग न ऑटोमायजेशन कंपनी शुक्रवारी अचानक बंद करण्यात आली. कंपनी तोट्यात असल्याचे सांगून बंद करण्यात आली आहे. कामगारांना कुठलीही पूर्वसूचना न देता अचानक बंद केल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून कामगारांनी जिल्हा कचेरीसमोर उपोषणाला बसण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना शुक्रवारी निवेदनातून दिला आहे. एमआयडीसी परिसरातील जिनिंग आणि प्रेसिंग ऑटोमायझेशनचे ऑपरेटर, टर्नर, फिटर, वेल्डर, मशीनिस्ट, हेल्पर तसेच ऑफिस क्लर्क म्हणून कार्यरत असलेले ४० ते ५० कर्मचारी शुक्रवारी २२ डिसेंबर रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ७.३० वाजता कंपनीत गेले असता कंपनीच्या गेटवरच नोटीस लावण्यात आली होती. नोटीस चुकीची असल्याचे कामगारांनी निवेदनात म्हटले आहे. एमआयडीसी परिसरात ही कंपनी निर्माण करणारे उत्पादन अमरावती एमआयडीसीमधील अन्य कुठलीही कंपनी करत नाही. कंपनी तोट्यात नसून कंपनी भरपूर प्रमाणात नफ्यातआहे. कंपनीच्या गेटवर नोटीस लावण्यापूर्वी कामगारांना कुठल्याही प्रकारची सूचना देऊन अवगत करण्यात आले नाही. कंपनीने लावलेली नोटीस बेकायदेशीर असून ती कामगारांना मान्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.*

*कंपनी पूर्ववत त्वरित सुरू करण्यात यावी, अन्यथा जिल्हा कचेरीसमोर बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा कामगारांनी निवेदनातून दिला आहे. निवेदन देताना रविंद्र चौधरी, छत्रपती ढेंबरे, रत्नाकर सोलोव, सचिन भेंडे, सुनील थोरांगे, प्रमोद भगत, विजय घोगरे, संदीप ठाकरे,*

*देवानंद कळमकर, अरुण लोणकर, किशोर धीमे, राजेश गाडे, सिताराम गाडगे, दिनकर पुणकर, रमेश तांबे, मनीष गडपायले, ज्ञानेश्वर बोंडे, नितीन मांडले, सुनील गुल्हाने, विनोद ओजा, निलेश खरड, अजय श्रीवास, संतोष गजभिये, अजय पेठे, निलेश नागपुरे, प्रमोद पोटे, यशवंत जिकार, शिवकुमार देशमुख, विनोद चराटे, विजय धोंगडे, निलेश जंवजाळ, रवींद्र यवतकर, सुरेश खोपे, राजेश जवंजाळ, रामदास मेमनकर, सुनील बानूवाकोडे,, प्रदीप नंद, उमेश चराटे यांच्यासह बहुसंख्य कामगार उपस्थित होते.*

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

## ५ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** राज्य उत्पादन शुल्क, अमरावतीव्दारे विशेष मोहिमेंतर्गत हातभट्टी दारु वाहतूक व मोहा फुलांची अवैध वाहतुक प्रकरणी कारवाई करण्यात आली. या कारवाईत हातभट्टी दारु व मोहाची फुले गोण्यासह ५ लक्ष ६१ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन अवैध वाहतूक करणाऱ्या व्यक्तीवर महाराष्ट्र दारुबंदी कायदानुसार गुन्हा नोंदविण्यात आला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्कचे निरीक्षक यांनी दिली.

आगामी नाताळ सण, नविन वर्षाच्या पार्श्वभुमीवर तसेच बहिरम यात्रा महोत्सवाच्या अनुषंगाने गावठी हातभट्टी दारु निर्मीती, विक्री, वाहतुक संदर्भात विशेष मोहिमेंतर्गत मध्यप्रदेश सीमालगत भागात गस्त लावून दि. २० डिसेंबर रोजी आरोपी संतोष रमेशराव शेवतकर, तसेच रेडवा ते घाटलाडकी रोडवर सुरेश रामराव राठोड यांच्या ताब्यातुन एक दुचाकी मोटर साईकलसह ६० लि. गावठी हातभट्टी दारु वाहतुक करताना जप्त करुन गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच दि. २१ डिसेंबर रोजी मिळालेल्या गुप्त बातमीनुसार सालबर्डी ते मोर्शी रोडवर मोर्शी तालुक्यातून मोह फुलांची अवैध वाहतुक होत असल्याबाबतची माहिती मिळाली. त्यानुसार संशयित वाहनांची तपासणी करीत असताना धम्मपाल साहेबराव चौकीकार, रा. सालबर्डी पो. मासोद ता. मुलताई जि. बैतुल व शेख कलीम शेख करीम, ता. मोर्शी जि. अमरावती यांच्या ताब्यातुन एक महिन्द्रा बोलेरो पिकअप चारचाकी वाहन व अंदाजे ४० किलो. क्षमतेची एकुन ७५ गोणी(पोते) पुर्णपणे मोहा फुलाने भरलेले त्यात एकुण ३ हजार किलो मोहाची फुले गोण्यासह मिळाली. त्याची एकुण किंमत ५ लक्ष १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला. विशेष मोहिमेमध्ये ५ लक्ष ६१ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल



जप्त करण्यात आला.राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभागाचे विभागीय उप आयुक्त अर्जुन ओहोळ, व अधीक्षक ज्ञानेश्वरी आहेर यांच्या मार्गदशनाखाली राबविण्यात आली. यावेळी विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक सुरज दाबेराव, दुय्यम निरीक्षक डॉ. सचिन मेश्राम, दुय्यम निरीक्षक एकनाथ शेजुळ, जवान बजरंग थोरात, पंकज भारती, महेश म्हैसकर, व वाहनचालक संजय देहाडे यांनी पार पाडली.

# ‘सपने नहीं हकीकत बुनते हैं, इसलिए तो सब मोदी को चुनते हैं’

## भाजपचं ठरलं! रामलल्लांच्या प्राण प्रतिष्ठापनेनंतर उमेदवारांची पहिली यादी जाहीर करणार

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली –** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. हिंदी भाषिक राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये मिळालेल्या दणदणीत विजयाने उत्साही झालेल्या भाजपने लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. विरोधकांकडून बैठकांचा जोर सुरू असताना दुसरीकडे आता भाजपकडून पुढील महिन्यातच थेट उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच भाजपकडून उमेदवारांची घोषणा सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या धर्तीवर लोकसभा निवडणुकीची तारीख जाहीर होण्यापूर्वीच उमेदवारांची घोषणा सुरू होणार आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात पहिली यादी जाहीर होऊ शकते. पुढील वर्षी २२ जानेवारीला रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापनेनंतर भाजप लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर करणार आहे.



मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराममध्ये निवडणुका जाहीर होण्यापूर्वी भाजपने उमेदवारांची घोषणा करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे उमेदवारांना प्रचाराची संधी मिळते, असे पक्षाचे मत आहे. तीन हिंदी भाषिक राज्यांमध्ये भाजपला मोठा विजय मिळाल्याने याचा फायदा झाल्याचे मानले जात आहे.

### निवडणुकीसाठी टॅग लाईन तयार

लोकसभा निवडणुकांसाठी भाजपकडून नवा नारा देण्यात आलाय. ’सपने नहीं हकीकत बुनते हैं, इसलिए तो सब मोदी को चुनते हैं’ असा नवा नारा आता भाजपकडून देण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपने सार्वत्रिक निवडणुकीत स्वबळावर दोनदा बहुमत मिळवले आहे. २०१४ मध्ये पक्षाने ’अच्छे दिन आने वाले हैं’ असा नारा दिला होता. तर २०१९ मध्ये ’फिर एक बार मोदी सरकार’ या टॅग लाईनने प्रचार केला होता.

# आमदाराच्या गाडीची मजुरांच्या ट्रॅक्टरला धडक

## एक ठार तर सहा जण गंभीर जखमी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर–** येथून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या लखापुर फाट्याजवळ कापूस वेचणी करणार्या मजुरांच्या ट्रॅक्टरला आमदार बळवंत वानखडे यांच्या वाहनाने जोरदार धडक दिली. ही घटना शुक्रवारी सायंकाळी ७ वाजता घडली. अपघातात दर्यापूर सेवा सहकारी सोसायटी क्रमांक ६ चे अध्यक्ष व काँग्रेस कार्यकर्ता मोहम्मद खालिक यांचा घटनास्थळी मृत्यू झाला असून अन्य सहा जण जखमी झाले आहेत. यातील दोन जण गंभीर जखमी असून त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एकविरा स्कूलच्या स्नेहसंमेलनाला भेट देण्यासाठी आ. यशोमती ठाकूर दर्यापूरला येत होत्या. त्यांच्याच गाडीत आ. बळवंत वानखडे होते आणि त्यांची गाडी यशोमतींच्या वाहनाच्या पाठीमागेच होती.दरम्यान मोहम्मद खालीक हे ट्रॅक्टरमध्ये कापूस व मजुरांना घेऊन दर्यापूरकडे येत असताना लखापुर फाट्याजवळ आ. वानखडे यांच्या वाहनाने ट्रॅक्टरला जोरदार धडक मारली. यावेळी गाडीत चालक व वानखडे यांचा स्वीय सहाय्यक दिक्षांत पाटील होते. धडक इतकी जबरदस्त होती की आ. वानखडे यांच्या गाडीचा पुढील भाग चेंदामेंद झाला. या अपघातात ट्रॅक्टरच्या मालक मोहम्मद खालीक (वय ५५, रा. दर्यापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. सुरेश शामराव सावळे (वय ५०, रा. समता नगर) आणि विमला जानराव राऊत (वय ५०, टाटा नगर) गंभीर जखमी आहेत. संगीता संजय नांदणे (वय ३५), नीता उमेश सावळे (वय ३५), संजय सुरेश इंगळे (वय ५५), लक्ष्मी गोपाल चव्हाण सर्व रा. टाटा नगर दर्यापूर अशी इतर जमखमींची नावे आहे. अपघातातील जखमींना तातडीने दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.



लखापुर फाट्याजवळची घटना

### घटनेचे अतीव दु:ख



मी नागपूर वरून दर्यापूरला येत असताना यशोमती ठाकूर या सुद्धा दर्यापूरला कार्यक्रमासाठी येणार असल्याचे समजले. मी माझ्या वाहनातून त्यांच्या वाहनात बसलो. यावेळी माझे वाहनांमध्ये माझे सचिव व चालक हे दोघेच होते. दर्यापूर जवळ येत असताना लखापुर फाट्याजवळ सदर मजुरांचा ट्रॅक्टर हा रस्त्यावर उभा होता. चालकाला ही बाब लक्षात न आल्याने हा अपघात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते. मृतक मोहम्मद खालिक हे आमचे सहकारी आहेत. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूचे मला अतीव दु:ख झाले आहे.

**–बळवंत वानखडे,** आमदार, दर्यापूर

# बुलढाण्यात दुष्काळग्रस्त ७३ महसूल मंडळात विविध सवलती

## विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

**दि.२३. विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा –** मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर झालेल्या बुलढाणा व लोणार तालुक्यात व एकूण ७३ महसूल मंडळात विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहे. यामुळे लाखो बाधित शेतकरी व नागरिकांना थोडाफार का होईना दिलासा मिळणार आहे.जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी ही माहिती दिली. शासनाच्या महसूल व वन विभागाच्या १० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार



बुलढाणा जिल्ह्यातील ११ तालुक्यामधील ७३ महसुली मंडळामध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. बुलढाणा व लोणार तालुक्यात मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

दुष्काळ घोषित झालेल्या तालुक्यांना विविध सवलती लागू करण्यात आल्या आहे. जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्ज वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू विज बिलात ३३.५० टक्के सूट, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता आदि सवलती लागू करण्यात आल्या आहे. तसेच आवश्यक तेथे पाणी पुरवठ्यासाठी टँकरचा व शेतक–यांच्या शेतीच्या पंपाची विज जोडणी खंडीत न करण्याचे आदेश देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी पाटील यांनी स्पष्ट केले.

# आ.प्रवीण पोटे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## नांदगाव पेठ एमआयडीसी मधील पाणी दरवाढीला ब्रेक

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** आ.प्रवीण पोटे यांनी पाठपुरावा केल्यामुळे तसेच राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात बैठक घेतल्यामुळे नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये पाण्याच्या दरवृध्दीवर ब्रेक लावण्यात आले आहेत. आता जुने ६७.६० रुपये केएल हे दर कायम ठेवण्याचे आदेश उद्योगमंत्री सामंत यांनी जारी केले असून, यामुळे उद्योजकांना दिलासा. मिळाला आहे.

कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी नांदगाव पेठ अतिरिक्त एमआयडीसीमध्ये कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (सीईटीपी) सह सात तारांकित सुविधा उपलब्ध होण्याचे स्वप्न दाखवले जाते. तसेच अनेक प्रकारच्या सबसिडी देण्याचा दावाही केला जातो. मात्र टेक्सटाईल युनिटकरिता पाणी अत्यावशक असूनही नांदगाव पेठ अतिरिक्त एमआयडीसीमध्ये पाण्याचेदर ६७ रुपयेकेएल (प्रती १००० लिटर) वरुन वाढवून २१२ रुपये करण्यात आले. यामुळे अमरावतीमधून टेक्सटाईल युनिट पळवण्याचे षडयंत्र तर सुरु नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तरीही पाण्याचे जेवढे रेट नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये आहेत, तेवढे रेट बुटीबोरी आणि छत्रपती संभाजी नगर मध्येही नाहीत.



### उद्योजकांसाठी पोटे आक्रमक

नांदगाव पेठ अतिरिक्त एमआयडीसी मध्ये सुरु उद्योगांमध्ये वापले जात असलेल्या पाण्यावर ट्रीटमेंट केली जात आहे, या प्रक्रियेनंतर पाणी उद्योगांना उपलब्ध केले जाते.सध्या नांदगाव पेठ अतिरिक्त एमआयडीसीमध्ये या ट्रीटमेंट केलेल्या पाण्याचे दर २१२ रुपये प्रती एक हजार लिटर करण्यात आले. एक टेक्स्टाईल युनिटला रोज कमीतकमी ९० हजार ते १ लाख लिटर पाण्याची आवश्यकता असते. सध्या नांदगाव पेठ अतिरिक्त एमआयडीसीमध्ये सुमारे १२ टेक्साटाईल युनिट सुरु आहेत. परंतु अचानक पाण्याचे दर अचानक वाढवल्यामुळे टेक्सटाइलचेसर्व युनिट ठप्प पडण्याची पाळी आली. अशा परिस्थितीतीत अमरावती टेक्सटाईल मॅन्युफॅक्चर असोसिएशनने आ प्रवीण पोटे पाटील यांची भेट घेवून पाण्याच्या अवाजवी दरांबाबत तक्रार केली.

**औरंगाबाद, बुटीबोरीतही एवढे दर नाहीत–** माजी मंत्री प्रवीण पाटील यांनी यासंदर्भात नागपूर अधिवेशनात उद्योगमंत्री उदय सामंत – यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत चर्चेनंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आदेश जारी केले की, निर्धारीत दर ६७.६० रुपये कायम ठेवण्यात यावे.यामुळे नांदगाव पेठ एमआयडीसीतील सर्व उद्योजकांना दिलासा मिळाला आहे.

# ६७ व्या राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेसाठी अकोला सज्ज; स्पर्धेचे उद्याला उद्घाटन

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अकोला–** ६७ व्या राष्ट्रीय शालेय क्रिडा स्पर्धांचे भारतीय शालेय खेळ महासंघाने आयोजन निश्चित केले असून, बॉक्सिंग स्पर्धेचा बहुमान जिल्ह्याला मिळाला आहे. शहरातील स्व. वसंत देसाई स्टेडीयममध्ये शालेय क्रीडा बॉक्सिंग स्पर्धा रंगणार असून, दि.२४ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास उद्घाटन होणार आहे. त्यानुषंगाने स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. स्पर्धेत देशभरातून १४, १७ व १९ वर्ष वयोगटातील तब्बल १,२०० विद्यार्थी सहभाग घेणार असल्याची माहिती आहे. वसंत देसाई स्टेडिअम परिसरात तीन बॉक्सिंग रिंग बनविण्याचे काम शुक्रवारी अंतिम टप्प्यात पोहोचले होते. स्पर्धेचे उद्घाटन रविवार, दि. २४ डिसेंबर रोजी होणार असून, समारोप २९ डिसेंबरला होणार आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी सतिशचंद्र भट यांच्या मार्गदर्शनात क्रिडा अधिकारी मनिषा ठाकरे, उदय हातवळणे, राजेश्वर पांडे आदी परिश्रम घेत आहेत.

**२८ राज्यातील खेळाडूंची नोंदणी–** राष्ट्रीय



शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये २८ राज्यातून खेळाडूंची नोंदणी झाली असून, स्पर्धेत १२०० च्यावर खेळाडू सहभागी होणार असल्याची माहिती आहे. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा सुद्धा शहरात संपन्न झाल्या. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेचा बहुमान जिल्ह्याला मिळाला असून, ही बाब अभिमानास्पद आहे.

### ३० शिक्षकांची घेतली मदत

स्पर्धेमध्ये देशभरातून खेळाडूंचे जिल्ह्यात आगमन होणार आहे. जिल्हा क्रीडा विभागामध्ये बहुतांश जागा रिक्त असल्याने मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी ३० शिक्षकांची मदत घेण्यात आल्याची माहिती आहे. खेळाडूंची जेवणाची व्यवस्था सावित्रीबाई फुले कन्या माध्यमिक विद्यालयात करण्यात आली असून, राहण्याची अग्रसेन भवन अकोला, जसनागरा पब्लीक स्कूल, रिधोरा., नॅशनल मिल्ट्री स्कूल, गायगाव येथे करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

# राजकमल चौकात खासदारांच्या निलंबनाविरुद्ध निदर्शने

## इंडिया आघाडी आक्रमक

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** इंडिया आघाडीतील खासदारांच्या नुकत्याच झालेल्या निलंबनाविरुद्ध शुक्रवारी स्थानिक राजकमल चौकात इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या १४६ खासदारांचे निलंबन हे लोकशाहीविरोधी असून, भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आपला फॅसिस्ट अजेंडा राबवित आहे. १४ डिसेंबरला संसदेची सुरक्षा भेदून दोन युवकांनी लोकसभेच्या प्रेक्षक गॅलरीतून मुख्य सभागृहात उड्या मारणे, ही बाब संसदेच्या व देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने निश्चितच गंभीर असल्यामुळे या घटनेची मुख्य जबाबदारी गृहमंत्री अमित शहा यांची आहे.

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात येऊन या घटनेवर निवेदन द्यावे व त्या युवकांना संसदेमध्ये प्रवेश करण्याकरिता प्रवेशिका देणार्या भाजप खासदाराची चौकशी करण्याची मागणी इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या खासदारांनी केली होती. ही मागणी मान्य करून या घटनेवर संसदेमध्ये नियमानुसार चर्चा घडवून आणणे शक्य असताना सुद्धा सरकारचा सुरक्षिततेच्या बाबतीत गलथान कारभार जनतेपुढे येईल, या भीतीपोटीच सरकारने विरोधी सदस्यांचे निलंबन केले, असा आरोप यावेळी नेत्यांनी केला. बेरोजगारी, महागाई व शेतकर्यांच्या प्रश्नावरून जनतेचे लक्ष विचलित करून सरकार आपला मनुवादी अजेंडा पुढे रेटत आहे.

सरकारच्या या लोकशाही व संविधान विरोधी कृत्याचा इंडिया आघाडीतील घटक पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय कम्युनिष्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना (उबाठा), आम आदमी पक्ष यांनी तीव्र निषेध करण्याकरिता २२ डिसेंबर रोजी राजकमल चौकात जाहीर निदर्शने केली. आंदोलनात तुकाराम भस्मे, मिलिंद चिमोटे, अशोक सोनारकर, सुभाष पांडे,



बबलू शेखावत, लता सोनारकर, भैय्या पवार, अभिनंदन पेंढारी, वैभव देशमुख, सुनील देशमुख, रमेश सोनुले यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

# ‘हम तय्यार है’ महारॅलीच्या तयारीवर करडी नजर

## कार्यकर्त्यांच्या वाहनांचे फोटो पाठवावे लागणार



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

२८ डिसेंबर रोजी नागपूरात होणाऱ्या काँग्रेसच्या ‘हम तय्यार है’ या महारॅली साठी जोरदार तयारी सुरू आहे. विदर्भातील प्रत्येक जिल्ह्याचा रोज आढावा घेतल्या जात आहे. हे संमेलन यशस्वी व्हावे म्हणून मोठी गर्दी जमविण्यावर भर दिल्या जाणार. कोणता नेता त्यात किती योगदान देणार, याची तपासणी आधीच केल्या जात आहे. जिल्हा समन्वयक म्हणून नेमलेल्या व्यक्तीवर विशेष जबाबदारी आहे.

ब्लॉक मधून नागपूरात येणाऱ्या वाहनांची क्रमांकासह यादी तयार करायची आहे. त्यासाठी एक जबाबदार पदाधिकारी नेमल्या जाणार आहे. वाहनाचा मार्ग, वाहनांची फोटोंसह ब्लॉक निहाय यादी, त्यावर ‘हम तय्यार है’चा लोगो, स्थानिक काँग्रेस समितीचे नाव यासह माहिती प्रदेश समितीकडे पाठवायची आहे. या सर्व गाड्या रवाना होईपर्यंत निरीक्षकास विधानसभा क्षेत्र सोडता येणार नाही.अमरावती जिल्ह्यातून १५ ते २० हजार कार्यकर्ते या महारॅलीत सहभागी होणार आहे.

# मोर्शी तालुक्यात कपाशिवर गेला लाल्या तुरीही करपण्याच्या मार्गावर

## शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करून नुकसान भरपाई देण्याची मागणी संत्रा कपाशिमुळे शेतकरी अडचणीत ; तुरीनेही शेतकऱ्यांच्या ‘हातावर दिल्या तुरी’

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील शेतकरी आधीच संकटात असताना तालुक्यात बहरलेल्या तुरीवर दव गेल्यामुळे कापसावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव जाणवू लागल्याने पुन्हा एकदा मोर्शी तालुक्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे कृषी विभागाच्यावतीने रोग नियंत्रणासाठी शेतक-यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. गेल्या दोन वर्षात कापसाला चांगला हमी भाव मिळत नसला तरी तूर कपाशीची मोठ्या प्रमाणात लागवड झाल्याचे दिसत आहे. शेतक-याने तूर कपाशीची लागवड करतांना महागडे बियाणे, रासायनिक खते, वाढती मजुरी अशा अवस्थेत तूर कपाशीची लागवड केली. अन दुष्काळात तेरावा महिना अशी गत निर्माण झाली आहे.



मोर्शी तालुक्यातील शेतकर्यांच्या पिकांचे बेहाल झाले असून, बळीराजा हतबल झाला आहे. पिकांची हि परस्थिती पाहून तरी शासनाने मोर्शी तालुक्यातील शेतकर्यांना तातडीने नुकसान भरपाई देऊन संकटातून बाहेर काढावे अशी रास्त मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केली आहे.

मोर्शी तालुक्यातील शेतकर्यांच्या शेतातील काळ्या मातीत दिमाखात डोलणारं तुरीचं पीक आज मात्र करपून गेलंय. ढगाळ वातावरणामुळे मोर्शी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकर्यांना जबर फटका बसला आहे. यंदा सोयाबीन कपाशी संत्रा आदी पीकं शेतकर्यांच्या हातातून गेली. वर्षभराचं आर्थिक गणित सांभाळणार्या संत्र्याने सुद्धा यावर्षी शेतकर्यांना अडचणीत आणले. आता बळीराजाची उरलीसुरली मदार तुरीच्या पीकावर होती. परंतु वातावरणात झालेल्या बदलामुळे तुरीनेही शेतकर्यांच्या 'हातावर तुरी' दिल्या आहेत. मागील पंधरा दिवसांपासून विदर्भात असलेल्या ढगाळ व धुक्याच्या वातावरणामुळे तुरीवर दवाळ रोगाचं सावट आलं आहे. वातावरणातील झालेल्या बदलामुळे मोर्शी तालुक्यातील हजारो हेक्टरवरील तुरी सध्या करपल्या आहेत.

मोर्शी तालुक्यात कपाशी आणि तूर लागवड मोठ्या प्रमाणात शेतकर्यांनी केली होती. कपाशी बोंड अळीने आणि अति पावसाने गेली. त्यामुळे तूर तरी तारेल ही त्यांना अपेक्षा होती. पण झालं उलटचं तूर चांगली येईल या आशेने त्यांनी रात्रंदिवस वन्यप्राण्यांच्या पासून तूर वाचावी म्हणून खडा पहारा दिला परंतु आलेल्या ढगाळ वातावरणाने होत्याचं नव्हतं झाल्यामुळे तुरीने त्यांच्या हातावर तुरी दिल्या.

मोर्शी तालुक्यात या वर्षी सुरवातीला पावसाने दगा दिल्यामुळे मृग बहाराचा संत्रा फुटलाच नाही , कापसाला बोंडे धरण्याच्या तर सोयाबीनला शेंगा पकडण्याच्या काळात पावसाने दांडी मारली. आता लाल्यारोग पडल्याने पाती, बोण्ड अलीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सोयाबीनवर करप्या रोग आल्याने सोयाबीनचे उत्पादन झाले नाही, तुरीही करपण्याच्या मार्गावर आहे .शेतकर्यांचा आंबिया बहाराचा संत्रा सुद्धा गळून पडल्यामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकर्यांचे मोठे नुकसान झाल्यामुळे शासनाने ताबडतोब कपाशी तूर पिकाचे सर्वेक्षण करून शेतकर्यांना नूकसान भरपाई द्यावी.

**रुपेश वाळके**
**उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोर्शी तालुका.**

# घाबरू नका, काळजी घ्या! मास्क वापरा, जेएच १ व्हेरिएंट सौम्य; तानाजी सावंत यांची माहिती

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



‘जेएच१’ चा नवा व्हेरिएंटचा एकच पेशंट महाराष्ट्रात आढळला आहे. त्याची लक्षणे आक्रमक नसून सौम्य आहेत. त्या रुग्णाला संसर्ग झाला तेव्हा लक्षणे काय होती. पिक कसा होता आणि शेवट कसा होता याचा ग्राफिकल डाटा सोमवारपर्यंत गोळा केला जाईल. त्याचे कोविड टास्क फोर्सचे अनालिसिस केले जाईल आणि त त्यानुसार उपचाराची दिशा ठरवली जाईल, अशी माहीती आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सिंधुदुर्ग येथे जेएच१ या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटचा रुग्ण सापडला असून त्याबाबत राज्याकडून काय तयारी सूरू आहे याबाबत आरोग्यमंत्री सावंत यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की राज्यातील सर्व आरोग्य संस्थांचे मॉक ड्रिल केले असून डॉक्टर, रुग्णालये, ऑक्सिजन बेड यांची पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दररोज सकाळी तासभर तालुका आरोग्य अधिका-यांसोबत बोलून माहीती घ्यावी, असे निर्देश दिले आहेत. सिंधुदूर्गातील पहिला रुग्ण हा स्थानिक होता. तो केरळला गेला असावा व त्यातून लागण झालेली असावी. नव्या व्हेरिएंटचे काँटॅक्ट ट्रेसिंग करत आहोत.

व्हेरिएंटबाबत माहीती देताना सावंत म्हणाले की, हा जीवावर उठणारा व्हेरिएंट नाही. जेएन १ हा स्ट्राँग किंवा घातक नाही. हा सौम्य आहे. जे पेशंट मिळालेले आहेत त्यांची सर्व माहीती घेतली जात आहे. जेएचवन हा फास्ट पसरत असला तरी सौम्य असून घाबरून जाण्याची गरज नाही. सध्या ख्रिसमस, थर्टी फस्ट यानिमित्त काही काळजी घ्यावी. मास्क सक्तीचा नाही पण कुटूंबियांसाठी मास्क वापरा. तसेच गर्दीपासून दुर रहावे.

खासगी हॉस्पिटल्स शासन व त्यांच्यामध्ये नोडल ऑफिसर ठेवला आहे. त्यांच्याकडे किती रुग्ण डमिट झाले याची माहीती समजेल. त्यासाठी घाबरून जाण्याचे कारण नाही. याच्या टेस्टिंग वाढवत आहे. मॉक ड्रिल करत आहोत. येत्या दोन ते तीन दिवसांत एक टास्क फोर्स नेमला जाईल. त्याच्याकडून मार्गदर्शन मिळेल.

# महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्र देण्याविषयी एसडीओंकडून अडवणूक

## महसूल मंत्र्यांकडे उमेश ढोणे यांची तक्रार; जाणीवपूर्वक त्रास देण्याचा प्रकार थांबवावा

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमाती चे जातप्रमाणपत्र देण्याविषयी प्रामुख्यांने उपविभागीय अधिकारी जाणीवपूर्वक त्रास देत असून ते केवळ टाईमपास करीत असल्याचा आरोप समाजबांधवांनी केला आहे. एसडीओंच्या कारनाम्याविषयी नुकतेच नागपूर अधिवेशनात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन वजा गाऱ्हाणी विषद करण्यात आले.हिवाळी अधिवेशनात महादेव कोळी समाजाला न्याय, हक्क मिळावा, यासाठी नागपूर आणि अमरावती येथील विभागीय आयुक्तकार्यालयापुढे बेमुदत अन्नत्याग उपोषण करण्यात येतं आहे. या



आंदोलनाची दखल घेत सरकारने सुद्धा अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याविषयी पुढकार घेतला. मात्र महसूल विभागाचे अधिकारी हे याप्रकरणी चालढकल करीत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे ही गंभीर बाब अधिवेशन दरम्यान ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना कृती समितीचे महासचिव उमेश ढोणे यांनी निवेदन देऊन समाजाच्या व्यथा मांडल्या. गेल्या अनेक वर्षापासून महादेव कोळी समाजाला अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र महसूल उपविभागीय अधिकारी यांच्या कडून जी.आर.चा विपर्यास काढला जात असून प्रमाणपत्र देण्यासदाठी अडवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला. उमेश ढोणे यांनी एकूणच घटनाक्रम विषद केला. ना. विखे पाटील यांनी महादेव कोळी समाजाच्या व्यथा आणि प्रश्न लक्षपूर्वक ऐकूत घेत त्यांच्या सचिवांना नोंद करून घेण्याचे सांगून तसे पत्र सर्व यंत्रणांना देण्यासाठी सांगितले. याविषयी नागपूर येथे विशाल बगाडे तर अमरावती येथे राजेन्द्र जुवार, गजानन चुनकिकर हे १८ दिवसापासून बेमुदत उपोषण करत असत्तांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना शासकिय जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले. याप्रकरणी तातडीने निर्णय घेण्यात यावा, असे उमेश ढोणे यांनी चर्चा करीत ना. विखे पाटील यांच्याकडे मागणी केली. यावेळी हेमंतजी पवार, संदीप बगाडे, ड मंगेश बुटे, सचीन वडाळ, अनील पुंनकर, ज्ञाणेश्वर बुंदे, पंकज राणे आदी समाज चळवळी मधील सकिर्य पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा मध्यवर्ती कारागृहात दोन कैद्यात हाणामारी



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेल्या दोन कैद्यांमध्ये शुक्रवारी दुपारच्या सुमारास जोरदार हाणामारी झाली. या घटनेनंतर वरिष्ठ पोलिसांसह फ्रेजरपुरा पोलिसांचा ताफा कारागृहात दाखल झाला होता.

कारागृह पोलिसांकडून प्राप्त प्राथमिक माहितीनुसार जिल्हा मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त असलेल्या पुणे व अमरावती येथील दोन कैद्यांचा काही कारणास्तव एकमेकांशी वाद झाला. त्यानंतर दोघांमध्ये हाणामारी झाली. या घटनेची माहिती मिळताच एसीपी कैलाश पुंडकर, ठाणेदार फ्रेजरपुराचे गोरखनाथ जाधव फौजफाट्यासह मध्यवर्ती कारागृहात पोहोचले. या संपूर्ण प्रकरणाची कारागृह प्रशासनाकडून माहिती मिळवतानाच कारागृहातील सीसीटीव्ही कॅमर्याचे फुटेजही तपासण्यात आले. फ्रेजरपुरा पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# सलग सुट्ट्यांमुळे द्रुतगती मार्गावर कोंडी; नाताळानिमित्त लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी

**दि. २३ विदर्भ प्रजासत्ताक लोणावळा:**

नाताळ सणाला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. लोणावळ्यात मोठ्या संख्येने मुंबईतील पर्यटक दाखल झाल्याने सकाळपासून द्रुतगती मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नाताळ सण सोमवारी (२५ डिसेंबर) आहे. शनिवार आणि रविवारला नाताळची सुट्टी जोडून आल्याने मोठ्या संख्येने मुंबई-पुण्यातील पर्यटकांनी सकाळपासून गर्दी केली होती. पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर खालापूर टोलनाका आणि खंडाळा घाटात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूकीचा वेग कमालीचा संथ झाला होता. त्यामुळे घाटात इंजिन गरम होऊन मोटारी बंद पडत होत्या. मोटारी बंद पडल्याने कोंडीत भर पडली. घाट क्षेत्रातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी बोरघाट महामार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीला या संस्थेचे कार्यकर्ते प्रयत्न करत होते. खंडाळा बोगदा परिसरात मुंबईकडे जाणारी वाहने काही काळ थांबवून ठेवण्यात आली होती. मुंबईहून लोणावळ्याकडे येणाऱ्या मोटारींसाठी सर्व सहा मार्गिका खुल्या करुन देण्यात आल्या होत्या.

# थंडीत जनावरांना ओढ्याचे पाणी पाजू नका; अंगावर पोते टाका

## पशुसंवर्धन विभागाने केले पशुपालकांना काळजी घेण्याचे आवाहन

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तापमानात घट झाल्याने थंडी वाढली असून, गार वारे सुटले असून अमरावती जिल्हा चांगलाच गारठला आहे. त्यामुळे जिल्यातील ग्रामीण भागातशेकोट्या पेटलेल्या पाहायला मिळत आहेत. या थंडीच्या लाटेत गोठ्याला ताटवे लावत जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

गत १५ दिवसांपूर्वी वातावरण ढगाळ होते. आता चार-पाच दिवसांपासून गार वारे सुटले आहे. पहाटे पाच वाजेदरम्यान गार वाऱ्याचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी दिवसाही शेकोट्या पेटवून नागरिक शेकताना दिसत आहेत. या थंडीमुळे जनावरांनाही त्रास जाणवू लागला आहे. अशावेळी पशुपालकांनी गोठ्याच्या चारही बाजूला ताटवे व बोंदरे लावून गोठा उबदार करावा, जेणेकरून अनावरांचा थंडीपासून बचाव होईल. मोठी जनावरे थंडीचा सामना करू शकतील. परंतु, नवजात वासरांना थंडीचा त्रास अधिक जाणवू शकतो. वेळी पशुपालकांनी वासरांची काळजी घेणे गरजेच आहे.

**विविध आजारांची शक्यता**

थंडीमुळे जनावरांना विविध आजारांची शक्यता



असते. वाढत्या थंडीमुळे जनावरांना काम करणे शक्य होत नाही. अशावेळी जनावरांची काळजी घेणे आवश्यक आहे. चिखलदरा,मेळघाट व परिसरातील पशुपालकांनी गाय, म्हैस, शेळी, मेंढी आदी जनावरांची थंडीच्या दिवसांत काळजी घ्यावी व उघड्यावर बांधू नये.

**जनावरांना उघड्यावर बांधू नये**

चार दिवसांपासून गार वारे मोठ्या प्रमाणात वाहू लागले आहे, अशावेळी पशुपालकांनी जनावरांना उघड्यावर बांधू नये. सकाळ, दुपार व सायंकाळ गोठ्यातच बांधून ठेवावे. थंडीच्या दिवसांत नदीवर, ओढ्यावर पाणी पाजू नये, गोठ्यातच जनावरांच्या अंगावर सुती पोते टाकावे. तसेच, गोठ्यातच सुती पोते अंथरावे, असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे.

# सुनील केदार यांची प्रकृती बिघडली, रात्री उशिरा मेडिकल रुग्णालयात दाखल :आय सी यु मध्ये उपचार सुरु

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

माजी मंत्री सुनील केदार यांना शुक्रवारी (२२ डिसेंबर) पाच वर्षांची शिक्षा सुनावल्यावर त्यांच्या वकिलांनी जामीन मिळवण्यासाठी सूत्रे हलवली. मात्र उशिरा निर्णय आल्यामुळे जामिनावर सुनावणी २६ डिसेंबरला होणार आहे. दरम्यान शुक्रवारी रात्री उशिरा सुनील केदार यांची प्रकृती बिघडली. त्यांना नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) अतिदक्षता विभागात दाखल केले गेले.



सुनील केदार यांना रात्री उशिरा आरोग्याबाबत त्रास सुरू झाला. त्यांनी 'मायग्रेन'मुळे तीव्र डोकेदुखी आणि छातीत दुखत असल्याची तक्रार केली. त्यांना तातडीने मेडिकल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात हलविण्यात आहे. येथे डॉक्टरांनी 'इसीजी' काढले असता थोडे बदल आढळून आले. हे बदल आधीचे आहे की आतचे, हे तपासले जात आहे. तूर्तास तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान न्यायालयाने केदार यांना शुक्रवारी सकाळी गुण्यात दोषी ठरवले आणि निर्णय सायंकाळी दिला. सायंकाळी निर्णय देतानाही बराच कालावधी लागला. सायंकाळी उशिरा निर्णय आल्यामुळे जामिनाच्या अर्जावर पूर्ण सुनावणी होऊ शकली नाही. पुढील दोन दिवस शनिवार आणि रविवार तसेच सोमवारी नाताळची सुट्टी असल्याने जामिनासाठी न्यायालयाने २६ डिसेंबरची तारीख निश्चित केली आहे. यामुळे सुनील केदार यांची निदान काही रात्र तरी कारागृहात जाणार आहे. दरम्यान शनिवारी केदार यांच्या मेडिकलमध्ये आणखी काही वैद्यकीय तपासणी होणार आहेत. त्यात केदार यांच्या आजाराबाबत ठोस कळणार असल्याने डॉक्टरांनी सांगितले.

## सुनील केदार यांची आमदारकी रद्द होणार? विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाकडे लक्ष

राज्याच्या राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. काँग्रेसचे विद्यमान आमदार आणि माजी मंत्री सुनील केदार यांची आमदारकी रद्द होण्याची शक्यता आहे. नागपूरच्या बहुचर्चित जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात कोर्टाने शुक्रवारी केदार यांना ५ वर्षांच्या कारावासाची आणि १२.५० लाख रुपये शिक्षा सुनावली आहे. नागपूर पोलिसांनी विधीमंडळाला केदार यांच्या शिक्षेची माहिती दिली असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. पोलिसांनी कोर्टाचे आदेश विधीमंडळास पाठवले असून केदार यांची आमदारकी रद्द करण्याबाबत आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.

कायद्याने आमदारांना २ वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा झाल्यास त्यांची आमदारकी रद्द होते. नागपूर जिल्हा बँक घोटाळ्यात कोर्टाने सुनील केदार यांना ५ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. त्यामुळे आता केदार यांची आमदारकी रद्द होण्याची शक्यता आहे. याबाबत विधानसभा अध्यक्ष काय निर्णय घेणार याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

# राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये छत्रपती शिवरायांवरील महानाट्याचा प्रयोग; राज्य सरकारचा निर्णय



**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्यभरातील शिवभक्तांसाठी सर्वात मोठी आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य सरकारतर्फे सर्व जिल्ह्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवरील महानाट्य दाखवले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात ३ दिवस या महानाट्याचा प्रयोग होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त ही मोठी घोषणा करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याशिषेक वर्षानिमित्त, २ जुन ते ६ जुन २०२४ या कालावधीत राज्य सरकारकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच कालावधीत छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार महानाट्याद्वारे सर्व जिल्ह्यातील जनसामान्य पर्यंत पोहचवण्यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

४० कोटी रुपये खर्च करुन राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये हे महानाट्य दाखवले जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची, नितीची, चरित्राची, विचाराचीं व कार्यकुशलतेची महती जनसामान्यांना, तरुण पिढीला समजावी, तसेच शिवरायांच्या अलौकिक वारशाला प्रसिद्धी मिळावी, यासाठी या महानाट्याचे नियोजन करण्याते आल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, छत्रपती शिवरायांवरील नेमके कोणते महानाट्य असेल हे सरकारने स्पष्ट केले नाही. जून २०२४ पर्यंत या महानाट्याचे प्रयोग प्रत्येक जिल्ह्यात होण्याची शक्यता आहे. या महानाट्यासाठी त्या- त्या जिल्ह्यातील नामांकित व्यक्तींना बोलावण्यात येणार असल्याचेही सांगण्यात येत आहे.

# 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत ८५८ लहान मुलांची आई-वडिलांशी पुर्नभेट

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

मध्य रेल्वे विभागाचे रेल्वे स्थानक परिसर, प्लॅटफॉर्मवरील रेल्वे पोलिस आणि इतर अग्रभागी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या आठ महिन्याच्या कालावधीत 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत ८५८ लहान मुलांची सुटका केली आहे. यात ५९१ मुले आणि २६७ मुलींचा समावेश असलेल्या आणि 'चाइल्डलाइन' या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्या बालकांच्या पालकांशी पुनर्भेट घडवून आणली आणि त्यांना स्वाधीन केले आहे. मुंबई रेल्वे विभागाने सर्वाधिक म्हणजे २५२ बालकांची सुटका केली. रेल्वे सुरक्षा बलाकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत लहान मुलांना गैरप्रकारांपासून वाचवण्याची जबाबदारीही ते योग्य पध्दतीने पार पाडत आहे. काही भांडणामुळे किंवा काही कौटुंबिक समस्यांमुळे अथवा उच्च चांगल्या जीवन पध्दती किंवा शहराचे ग्लॅमर आदींच्या शोधात आपल्या कुटुंबियांना न सांगता रेल्वे स्थानकावर येणारी मुले रेल्वे सुरक्षा बलाच्या (आरपीएफ) जवानांच्या निदर्शनास येत असतात. हे प्रशिक्षित रेल्वे सुरक्षा बलाचे कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात आणि त्यांच्या समस्या समजून घेतात. त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा भेटण्याचा सल्ला देतात. रेल्वेच्या या उदात्त सेवेबद्दल अनेक पालक त्यांचे मनापासून आभार आणि कृतज्ञता व्यक्त करतात.

# दिलेला शब्द पाळता येत नसेल तर...

## सोयरे प्रकरणाचा उल्लेख करत बच्चू कडूंचा शिंदे सरकारला घरचा आहेर

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक बिड**

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी राज्यातल्या शिंदे-फडणवीस सरकारला २४ डिसेंबरपर्यंतचा अल्टीमेटम दिला होता. परंतु, दिलेल्या मुदतीत सरकारला हा प्रश्न मार्गी लावता आलेला नाही. त्यामुळे जरांगे यांची समजूत काढण्यासाठी आणि मुदत वाढवून मिळावी यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू झाले आहेत. कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत आणि संदीपान भुमरे यांनी दोन दिवसांपूर्वी अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. दोन तासांहून अधिक वेळ चर्चा झाली तरी या चर्चेतून कोणताही मार्ग निघाला नाही. तसेच या चर्चेवेळी 'सोयरे' या शब्दावरून बराच वेळ वाद चालू होता.



या चर्चेनंतर गिरीश महाजन म्हणाले, आमच्या याआधीच्या बैठकीत लिखित स्वरुपात काही बाबी ठरवल्या होत्या. सरकारकडून नोंदी काढण्याचे काम झाल्यानंतर त्यामध्ये ज्यांची नावं असतील त्यांना आणि त्यांच्या रक्तातील नातेवाईकानाच आरक्षण दिलं जाईल. पत्नीकडील नातेवाईकांना आरक्षण दिलं जाणार नाही. देशभरात तसा कायदा आहे. परंतु, आमच्या मागील बैठकीत कागदावर काही बाबी ठरवल्या होत्या. त्यात 'सगेसोयरे' हा शब्द होता. जरांगे पाटील यांच्या म्हणण्यानुसार सोयरे म्हणजे आपले व्याही. या शब्दाचा शब्दश: अर्थ त्यांनी लावला आहे. परंतु, नियमानुसार रक्ताचे नातेवाईक सोडून इतरांना म्हणजे सोयरे किंवा व्याहींना आरक्षण देता येत नाही.

राज्य सरकारने मागील चर्चेवेळी सोयरे शब्दाला संमती दर्शवली होती. परंतु, आता ते शक्य नाही असं सांगितलं जात आहे. त्यावरून राज्य सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील चर्चा निष्फळ ठरत आहेत. यावरून आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारला टोला लगावला आहे. बच्चू कडू म्हणाले, सरकारने मनोज जरांगे यांना काही शब्द दिले होते. परंतु, सरकारला ती आश्वासनं पूर्ण करता आली नाहीत, हे दुर्दैवी आहे.

आमदार बच्चू कडू म्हणाले, मुळात सोयरे म्हणजे जिथे आपली सोयरीक होऊ शकते. आपली सोयरीक आपल्या जातीत होते, असं मनोज जरांगे यांचं म्हणणं आहे. परंतु, सरकारने सोयरे शब्दाचा चुकीचा अर्थ काढला. त्यामुळे आधी सोयरे या शब्दाची व्याख्या करणं गरजेचं आहे. व्याख्या झाली तर आपल्याला पुढे जाता येईल. मागच्या बैठकीवेळी आपण सरकारला काही शब्द दिले, सरकारनेही आपल्याला काही शब्द दिले होते. परंतु, सरकारने दिलेले शब्द पाळले नाहीत, हे खूप दुर्दैवी आहे. त्यामुळे मराठा समाजाला असं वाटतं की मागच्या वेळी झाली तशी फसणवूक आता होऊ नये.याविषयी आपलं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणं झालं आहे, असं सांगत बच्चू कडू म्हणाले, सरकारला आता जर एखादा शब्द द्यायचा असेल तर आधी त्याचा पूर्ण विचार करून द्यावा. शब्द दिला आणि तो पूर्ण करू शकलो नाही तर त्याचा समाजमनावर परिणाम होतो. लोकांच्या मनात सरकारविरोधात भावना निर्माण होतात. उग्र प्रतिक्रिया उमटू लागतात.

# विविध उपक्रम राबवा; ५१ लाखांचे बक्षीस मिळवा

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान : शिक्षण विभागाकडून जनजागृती सुरू

**अरुण जोशी**

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्य शासनातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राबविले जाणार आहे. या अभियानात सर्व शाळांनी विविध उपक्रम राबवून सहभागी व्हायचे आहे. १ लाखापासून ५१ लाखांपर्यंतची बक्षिसे उत्कृष्ट उपक्रम राबविणाऱ्या शाळांना दिली जाणार आहेत. अधिकाधिक शाळांनी यात सहभागी होण्यासाठी सध्या जनजागृती केली जात आहे.

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या विद्यार्थीकेंद्रित अभियानाचा कालावधी ४५ दिवसांचा आहे. आरोग्य, आर्थिक आणि कौशल्य विकासावर यातून भर दिला जाणार आहे. भौतिक सुविधा, तंबाखूमुक्ती आणि प्लास्टिकमुक्ती अभियान या उपक्रमातून राबविले जाणार आहे. सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांनी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानात सहभागी होणे अपेक्षित आहे. विजेत्या शाळांना रोख पारितोषिक दिली जाणार आहेत.




### ५१ लाखांपर्यंतची बक्षिसे

या अभियानासाठी शाळांची अशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशी विभागणी करण्यात येणार आहे. प्राथमिकपासून राज्यस्तरापर्यंत प्रत्येक स्तरातील विजेता या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येणार आहे. तालुका, जिल्हा तसेच विभागीय पारितोषिके दिली जाणार आहेत. राज्यस्तरावर तसेच सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी पहिले पारितोषिक ५१ लाख रुपये, दुसरे पारितोषिक २१ लाख रुपये आणि तिसरे पारितोषिक ११ लाखांचे राहणार आहे.

### काय आहे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान

जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमाच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांमध्ये शाळेप्रती उत्तरदायित्त्वाची भावना निर्माण व्हावी तसेच स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे, यासाठी हे अभियान राबविले जात आहे.

### असे होणार मूल्यांकन

गाव आरोग्य, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास, भौतिक सुविधा, तंबाखूमुक्तती, प्लास्टिकमुक्ती अशा उपक्रमांसाठी गुण देण्यात येणार आहेत. यासाठी नेमलेली एकूण २ तपासनीसांची समिती शाळांनी राबविलेल्या परिणामकारक उपक्रमांचे परीक्षण करून मूल्यांकन करणार आहे.

### अभियानाची उद्दिष्टे काय?

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करणे, अध्ययन - अध्यापन आणि प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देणे, शिक्षणासाठी पर्यावरणपूरक आणि आनंददायी वातावरण निर्मिती करणे, क्रीडा, आरोग्य, वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी अभियान राबविले जाणार आहे.

# 'तुरुंगवास पत्करावा लागला तरी चालेल पण माफी मागणार नाही', सुषमा अंधारे ठाम; थेट नीलम गोऱ्हेंना पत्र

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

हक्कभंग कारवाईच्या संदर्भात दिलेल्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या निर्देशांबाबत ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्र लिहिलं आहे. मी माफी अजिबात मागणार नाही. यासाठी कारवाईचा भाग म्हणून मला तुरुंगवास पत्करावा लागला तरी माझी तयारी आहे, असं अंधारे यांनी पत्रात म्हटलं आहे.



उपसभापती नीलम गोऱ्हे रविंद्र धंगेकरांना सभागृहात बोलू देत नाहीत अशा आशयाचा व्हिडीओ सुषमा अंधारेंनी प्रसिद्ध केला होता. मुळात धंगेकर या सभागृहाचे सदस्य नाहीत त्यामुळे तात्काळ सुषमा अंधारे यांच्यावर हक्कभंग आणावा, अशी मागणी सत्ताधारी पक्षाने केली होती. त्यानंतर अंधारेंना आठ दिवसात दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितलं होतं. तसंच दिलगिरीचं पत्र न आल्यास प्रवीण दरेकरांना मी हक्कभंग मांडण्यास परवानगी देईन, असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या होत्या. त्यानंतर सुषमा अंधारेंनी हे पत्र लिहिलं आहे.

# निर्वस्त्र छायाचित्रे प्रसारीत करण्याची धमकी; अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## ६ लाख रुपयांची खंडणीही उकळली

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

येथील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला धमकावत अत्याचार करणाऱ्या आणि तिची निर्वस्त्र अवस्थेतील छायाचित्रे प्रसारीत करण्याची धमकी देत ६ लाख रुपयांची खंडणी उकळणाऱ्या आरोपीला नांदगावपेठ पोलिसांनी अटक केली आहे.

कार्तिक संजीव पुसदकर (२०) असे आरोपीचे नाव आहे. तक्रारीनुसार अमरावती शहरात राहणारी पीडित मुलगी आणि आरोपी एकमेकांच्या ओळखीचे आहेत. गेल्या १ ऑक्टोबरला आरोपीने पीडित मुलीला नांदगावपेठ येथील एका भाडेतत्वावरील सदनिकेत नेले, तेथे तिच्यावर बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यावेळी आरोपीने पीडित मुलीचे निर्वस्त्र अवस्थेतील छायाचित्रे काढली. ती समाज माध्यमांवर प्रसारीत करण्याची धमकी देऊन तिच्याकडून



१ लाख रुपये रोख आणि ८० ग्रॅम सोन्याचे दागिने असा ६ लाख रुपयांचा ऐवज उकळला. तिच्यावर अनेकवेळ अत्याचार करण्यात आले. त्यानंतरही त्याची मागणी कमी होत नव्हती.

आरोपीने पीडित मुलीकडे १० ते १२ लाख रुपयांची मागणी केली. आर्थिक आणि शारीरिक छळ असह्य झाल्याने अखेर पीडित मुलीने आई-वडिलांना हा प्रकार सांगितला. त्यानंतर त्यांनी नांदगावपेठ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. आरोपीला २६ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# सावित्रीच्या लेकींना रोज एकच रुपया भत्ता; तो तरी कधी मिळणार गुरुजी?

## जिल्ह्यात अनेक वर्षांपासून भत्ता प्रलंबित विद्यार्थी व पालक प्रतीक्षेत

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शाळांमध्ये विद्यार्थिनींची उपस्थिती वाढावी व ती टिकावी, या उद्देशाने शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थिनींना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थिती भत्ता दिला जातो. दररोज एक रुपया याप्रमाणे शाळेच्या संपूर्ण दिवशी हा भत्ता मिळतो. मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून शैक्षणिक सत्रातील विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता अजूनही मिळाला नाही.

त्यामुळे विद्यार्थिनी व पालकांकडून भत्ता केव्हा मिळणार गुरूजी, अशी विचारणा होत आहे. सन २०२० ते २०२३ या शैक्षणिक



सत्रात इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत अनेक विद्यार्थिनी जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यंदा जिल्ह्यात ३१ हजार ७३९ विद्यार्थिनी इयत्ता पहिली ते चौथीमध्ये प्रवेश घेतला आहे.

**एक रुपयाही मिळेना**

शासनाकडून उपस्थिती भत्त्यासंदर्भात प्राप्त झालेला निधी जि. प. शिक्षण विभागाकडून बीडीओच्या खात्यात वळता केला जातो. तेथून गटशिक्षणाधिकारी व त्यानंतर शाळेतील मुख्याध्यापकांच्या खात्यात हा निधी जातो. धनादेशाद्वारे पाल्यांना हा भत्ता दिला जातो.

**अनेक वर्षांपासून एक पैशाचीही वाढ नाही**

एक रुपया प्रतिदिवस भत्त्यात मागील अनेक वर्षापासून एक पैशाचीही वाढ करण्यात आली नाही. अनुसूचित जाती, भटक्या जाती, विमुक्त जमाती प्रवर्गातील विद्यार्थिनींना हा भत्ता मिळतो. मात्र, त्या विद्यार्थिनी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असणे आवश्यक आहे.